मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा तीन महिन्यांपासून धूळखात

## शहरातील 17 चौकात हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा : कामासाठी तीन कोटी 90 लाखांचा खर्च

**पिंपरी | प्रतिनिधी**

वाढते शहरीकरण आणि औद्योगिकरणामुळे हवेची गुणवत्ता दिवसेंदिवस ढासळत चालल्याने हवा शुद्ध होण्यासाठी महापालिकेने शहराच्या विविध भागात हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा (एअर बिन प्युरिफायर) बसविली आहे. मात्र, तीन महिने झाले तरी ही यंत्रणा अद्याप सुरु झाली नसून ती धूळखात पडून आहे.

महापालिकेच्या वतीने पिंपरी चौकात शहरातील हवेची गुणवत्ता दर्शविण्यासाठी कृत्रिम फुफ्फुसे बसविली होती. ती महिनाभरातच काळी पडल्याने शहराची गुणवत्ता ढासळत असल्याचे सिद्ध झाले. त्यामुळे दिल्लीच्या धर्तीवर पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविली आहे. राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रमाअंतर्गत (एनसीएपी) शहरातील १७ चौकात हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविण्यात आली आहे. दर दहा मिनिटांनी या यंत्रणेद्वारे पाण्याचे तुषार उडविले जाणार आहेत. त्यामुळे हवेतील धुळीकण जड होऊन खाली बसतील. वर्दळीच्या चौकांत आकर्षक रचनेतील यंत्रणा बसविण्यात आली आहे. पाणीपुरवठा करण्यासाठी त्याखाली ५०० ते एक हजार लिटर क्षमतेची पाण्याची टाकी बांधण्यात आली आहे. या कामासाठी तीन कोटी ९० लाखांचा खर्च झाला आहे.



पिंपरीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, भोसरी, नाशिक फाटा, चिंचवड स्टेशन, कस्पटे वस्ती, होळकर चौक, नेहरूनगर चौक, मोशी गोडाऊन चौक, चिंचवड येथे हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, आकुर्डी खंडोबा चौक, नाशिक फाटा, नेहरूनगर चौक, चिखली आरटीओ चौक, चिंचवडगाव चौक, रावेत-भोंडवे चौक, कोकणे चौक, तळवडे चौक, एमएए स्कूल चौक या चौकात 'मिस्ट फाऊंटन' बसविण्यात आले आहेत. त्याला तीन महिन्यांचा कालावधी लोटला आहे. तरी, अद्याप ते सुरू झालेले नाहीत.

हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविण्याचे काम पूर्ण झाले आहे. चाचणी सुरू असून, ते लवकरच सुरू करण्याचे नियोजन असल्याचे पर्यावरण विभागाचे सह शहर अभियंता संजय कुलकर्णी यांनी सांगितले.

# खासदार बारणेंना प्रचंड बहुमताने विजयी करणार

## मावळ भाजपचा निर्धार : महाराष्ट्र भाजपचे प्रभारी दिनेश शर्मा यांच्या उपस्थितीत बैठक

**पिंपरी | प्रतिनिधी**

देशाचे नेतृत्व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भक्कम हातांमध्येच रहावे यासाठी मावळ लोकसभा मतदारसंघात भाजपा शिवसेना राष्ट्रवादी आरपीआय रासप मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनाच तिसऱ्यांदा प्रचंड मताधिक्याने विजयी करण्याचा निर्धार मावळ तालुक्यातील भाजप पदाधिकाऱ्यांनी केला.

गुरुदत्त मंगल कार्यालय कामशेत येथे मावळ लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारार्थ महाराष्ट्र भाजपचे प्रभारी व उत्तर प्रदेशचे माजी उपमुख्यमंत्री दिनेश शर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत मावळ विधानसभा मतदारसंघातील भारतीय जनता पार्टीच्या प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते, सुपर वॉरियर्स व बूथ अध्यक्ष यांचा संवाद मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी शर्मा यांनी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. नरेंद्र मोदी यांना पुन्हा एकदा पंतप्रधान करण्यासाठी बारणे यांना बहुमताने निवडून देण्याचे आवाहन केले.

### 'महाविकास आघाडीला धडा शिकवा'

अयोध्येतील राम मंदिर निर्माण कार्यास विरोध करणाऱ्यांना, 370 वे कलम हटविण्यास विरोध केला अशा काँग्रेस, शरद पवार गट व शिवसेना उद्धव ठाकरे गटाला या निवडणुकीतून आपण हद्दपार करावे व विकसित भारतासाठी मोदींना पंतप्रधान करण्यासाठी भाजपच्या सर्व कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागण्याच्या सूचना शर्मा यांनी केल्या.



मावळ विधानसभा कोअर कमिटीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांसोबत देखील शर्मा यांनी बैठक घेतली. मावळ विधानसभा मतदारसंघातील संघटनात्मक कार्याचा आढावा घेऊन महायुतीचे उमेदवार निवडून आणण्यासाठी महायुतीतील सर्व घटक पक्षांशी समन्वय ठेऊन कार्य करण्याच्या सूचना दिल्या.

### 'मावळातून किमान 50 हजारांचे मताधिक्य'

बारणे यांना मावळ विधानसभा मतदारसंघातून 50 हजारांहून अधिक मतांची आघाडी मिळवून देऊ, अशी ग्वाही निवडणूक प्रमुख रवींद्र भेगडे यांनी यावेळी दिली.

बैठकीस भाजपा पश्चिम महाराष्ट्र संघटन मंत्री मकरंद देशपांडे, भाजपा पुणे उत्तर जिल्हाध्यक्ष शरदभाऊ बुट्टे पाटील, मावळ लोकसभा समन्वयक सदाशिव खाडे, पश्चिम महाराष्ट्र संपर्क प्रमुख योगेश बाचल, मावळ भाजपा अध्यक्ष दत्तात्रय भाऊ गुंड, माजी सभापती गुलाब म्हाळसकर, युवा मोर्चाचे प्रदेश सचिव रघुवीर शेलार, प्रदेश भाजपा निमंत्रित सदस्य जितेंद्र बोत्रे, युवा मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष बाळासाहेब घोटकुले, कामगार आघाडी जिल्हाध्यक्ष किरण राक्षे, ओबीसी आघाडी जिल्हाध्यक्ष दत्तात्रय माळी, लोकसभा विस्तारक भूषण जोशी, विधानसभा विस्तारक, रवींद्र देशपांडे, तळेगाव शहर भाजपा अध्यक्ष अशोक दाभाडे, लोणावळा शहर भाजपा अध्यक्ष अरुण लाड, देहूरोड शहर भाजपा अध्यक्ष लहुमामा शेलार, युवा मोर्चा अध्यक्ष नितीन मराठे, महिला मोर्चा अध्यक्षा सायली बोत्रे यांच्यासह मावळ विधानसभा मंडळ संघातील सर्व मंडळाचे सरचिटणीस सर्व सुपर वॉरियर्स, बूथ अध्यक्ष व आजी-माजी पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त शहरातील वाहतुकीत बदल

## वाहनचालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे वाहतूक पोलिसांचे आवाहन



**पुणे | प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त रविवारी (१४ एप्रिल) जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात वाहतूक बदल करण्यात येणार आहेत. या भागातील रस्ते वाहतुकीस बंद ठेवण्यात येणार असून, वाहनचालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन वाहतूक पोलिसांनी केले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यासाठी अनुयायांची मोठी गर्दी होती. या भागात होणारी गर्दी विचारात घेऊन रविवारी सकाळी सहापासून रात्री गर्दी ओसरेपर्यंत वाहतूक बदल करण्यात येणार आहेत. वाहनचालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त रोहिदास पवार यांनी केले आहे.

**वाहतूक बदल पुढीलप्रमाणे :**

मंगळवार पेठेतील शाहीर अमर शेख चौकापासून जिल्हाधकारी कार्यालयाकडे जाणारा रस्ता वाहतुकीस बंद ठेवण्यात येणार आहे. या भागातील वाहतूक शाहीर अमर शेख चौकातून वळविण्यात येणार असून, वाहनचालकांनी प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) चौकातून इच्छितस्थळी जावे. मुख्य टपाल कार्यालय परिसरातून (जीपीओ) जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जाणारी वाहतूक वळविण्यात येणार आहे. जीपीओ चौकातून बोल्हाई चौकाकडे जाणाऱ्या वाहनांनी नेहरु मेमोरिअल हॉल चौकमार्गे इच्छितस्थळी जावे. पुणे स्टेशनकडून मालधक्का चौकाकडे जाणारी वाहतूक वळविण्यात येणार असून, वाहनचालकांनी अलंकार चित्रपटगृह चौकमार्गे इच्छितस्थळी जावे.

सोमवार पेठेतील नरपतगिरी चौकातून मालधक्का चौकाकडे जाणारी वाहतूक वळविण्यात येणार असून, वाहनचालकांनी १५ ऑगस्ट चौक, कमला नेहरु रुग्णालय, पवळे चौकमार्गे इच्छितस्थळी जावे. रास्ता पेठेतील बॅनर्जी चौकातून शाहीर अमर शेख चौकाकडे जाणारी वाहतूक वळविण्यात येणार आहे. वाहनचालकांनी नरपतगिरी चौक, पंधरा ऑगस्ट चौक, कमला नेहरु चौक, पवळे चौक, कुंभारवेस चौकातून इच्छितस्थळी जावे.

जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात येणाऱ्या अनुयायांसाठी वाहने लावण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. मालधक्का चौक ते बोल्हाई चौक, बोल्हाई चौक ते साधू वासवानी चौक, बोल्हाई चौक ते जीपीओ, बोल्हाई चौक ते नरपतगिरी चौक, फोटो झिंको प्रेस उपरस्ता, बोल्हाई चौक ते बॅनर्जी चौक या भागात वाहने लावण्यास मनाई करण्यात आली आहे.

**ससून रुग्णालयात जाणाऱ्या वाहनांसाठी प्रवेश**

ससून रुग्णालयात जाणारे रुग्ण, तसेच रुग्णवाहिकांसाठी शवागाराजवळील (डेड हाऊस) प्रवेशद्वाराने प्रवेश देण्यात येणार आहे. अन्य वाहनांना या मार्गाचा वापर करता येणार नाही. एसएसपीएमएस मैदान (दुचाकी आणि चारचाकी वाहने), पुणे स्टेशन येथील तुकाराम शिंदे वाहनतळ (दुचाकी आणि चारचाकी वाहने), ससून क्वार्टर्स (दुचाकी) येथे वाहने लावण्याची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**दांडेकर पूल परिसरात वाहतूक बदल**

दांडेकर पूल परिसरात मोठ्या प्रमाणावर डॉ. आंबेडकर जयंती साजरी करण्यात येते. स्वारगेटकडून सिंहगड रस्त्याकडे जाणारी वाहतूक वळविण्यात येणार आहे. वाहनचालकांनी स्वातंत्र्यवीर सावरकर चौक, सणस मैदान रस्ता, ना. सी. फडके रस्ता, मांगीरबाबा चौक, सेनादत्त चौकी, दत्तवाडी परिसरातून सिंहगड रस्त्याकडे जावे. सिंहगड रस्त्यावरुन स्वारगेटकडे येणाऱ्या वाहनांनी गणेशमळा परिसरातील हॉटेल आशा, दत्तवाडी, सेनादत्त चौकीमार्गे, मांगीरबाबा चौकातून वळून ना. सी. फडके सभागृहमार्गे स्वारगेटकडे जावे. शास्त्री रस्त्याने स्वारगेटकडे जाणाऱ्या वाहनांनी मांगीरबाबा चौकातून डावीकडे वळून ना. सी. फडके चौकमार्गे स्वारगेटकडे जावे.

**लष्कर, विश्रांतवाडी भागात वाहतूक बदल**

लष्कर भागातील डॉ. आंबेडकर पुतळा परिसरात होणारी गर्दी विचारात घेऊन या भागातील वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली आहे. पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यासाठी येणाऱ्या अनुयायांनी तारापोर रस्ता, इस्ट स्ट्रीट परिसरात वाहने लावावीत. विश्रांतवाडीतील मुख्य चौकात मोठ्या प्रमाणावर डॉ. आंबेडकर जयंती साजरी करण्यात येत असल्याने या भागातील वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात आले आहेत. विश्रांतवाडीतून टिंगरेनगर, विमानतळाकडे जाणारी वाहतूक मनोरुग्णालय, येरवडा कारागृहमार्गे वळविण्यात आली आहे.

# शरद पवार यांचा बेरजेच्या राजकारणावर भर

## शरद पवारांनी तब्बल 55 वर्षांनी घेतली काकडे कुटुंबियांची भेट : विरोधाला तिलांजली



**पुणे | प्रतिनिधी**

बारामती लोकसभा मतदार संघाच्या निवडणुकीच्या प्रचाराला रंगत येऊ लागली असताना, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी पुणे जिल्ह्यातील बेरजेच्या राजकारणाला सुरुवात केली आहे. पवार यांनी राजकारणात कोणी कोणाचे कायमचे मित्र आणि कायमचे शत्रू नसल्याचे दाखवून राजकीय हाडवैर विसरून आजवरच्या कट्टर विरोधकांच्या भेटी घेऊन धक्कातंत्र अवलंबले आहे. भोरचे माजी आमदार अनंतराव थोपटे यांच्याबरोबर असलेले शत्रुत्त्व विसरून त्यांनी तब्बल २५ वर्षांनी भेट घेतल्यानंतर बारामतीतील पवार यांचे पारंपरिक विरोधक असलेल्या काकडे कुटुंबीयांची तब्बल ५५ वर्षांनी भेट घेऊन राजकारणातील विरोधाला तिलांजली दिली.

बारामती तालुक्यामध्ये पवार आणि काकडे कुटुंबीयांमध्ये कायमच शत्रूत्त्वाची भावना राहिली आहे. शरद पवार यांनी बारामती लोकसभा मतदार संघात प्रत्यक्ष निवडणुकीच्या राजकारणाला सुरुवात करण्यापूर्वी बारामतीवर काकडे कुटुंबीयांचे वर्चस्व होते. मात्र, पवार यांनी प्रवेश केल्यानंतर काकडे कुटुंबांच्या अस्तित्त्वाचा प्रश्न निर्माण झाला. बारामतीमध्ये १९७१ ते १९८४ या कालावधीत काकडे कुटुंबीयांची चलती होती. पवार यांच्या हाती बारामतीच्या सूत्रे आल्यानंतर काकडे कुटुंब हे मागे पडले. मात्र, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गेल्या काही वर्षांपासून काकडे कुटुंबीयांशी जुळून घेण्यास सुरुवात केली आहे. शेतकरी कृती समितीचे नेते सतीश काकडे यांचे चिरंजीव अभिजीत काकडे यांना त्यांनी सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या संचालक पदावर संधी दिली.

आता बारामती लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराला रंगत येऊ लागली असताना शरद पवार यांनी बेरजेच्या राजकारणाला सुरुवात केली आहे. गेल्या महिन्यात भोरचे माजी आमदार अनंतराव थोपटे यांची त्यांनी तब्बल २५ वर्षांनी भेट घेतली. त्यानंतर आता काकडे कुटुंबीयांची भेट घेऊन राजकीय धक्का दिला. माजी खासदार संभाजीराव काकडे यांच्या पत्नी कंठावती काकडे यांचे नुकतेच निधन झाले. या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनी काकडे कुटुंबाची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

**काकडे-पवार कुटुंबीयांतील राजकीय संघर्ष**

बारामती लोकसभा मतदार संघामध्ये काकडे कुटबीयांतील रामराव काकडे यांनी १९७१ मध्ये अपक्ष निवडणूक लढविली. त्यावेळी काँग्रेसचे रघुनाथ खाडीलकर यांनी त्यांचा पराभव केला होता. त्यानंतर १९७७ च्या निवडणुकीत माजी खासदार संभाजीराव काकडे हे भारतीय लोकदल या पक्षाकडून निवडणुकीला उभे राहिले. त्यांनी माजी खासदार विठ्ठलराव गाडगीळ यांचा पराभव केला होता. त्या विजयाने काकडे कुटुंबीयांच्या हाती बारामतीची सूत्रे आली. त्यानंतरच्या निवडणुकीत संभाजीराव काकडे हे जनता पक्षाकडून उभे राहिले. मात्र, काँग्रेसचे माजी खासदार शंकरराव बाजीराव पाटील यांनी त्यांचा पराभव केला.

१९८४ च्या निवडणुकीत पवार यांनी लोकसभेची निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी पाटील यांना तिकीट नाकारून काँग्रेसने पवारांना उमेदवारी दिली. त्यामुळे पाटील यांनी बंडखोरी करत अपक्ष निवडणूक लढविली. त्यामध्ये पवार यांनी पाटील यांचा पराभव करत दिल्ली गाठली. त्यानंतरच्या १९८९ च्या निवडणुकीच्यावेळी पवार हे राज्याच्या राजकारणात आले. काँग्रेसने पुन्हा शंकरराव पाटील यांना उमेदवारी दिली. त्यांच्याविरोधात संभाजीराव काकडे यांनी जनता दलाकडून निवडणूक लढविली. त्यावेळी पाटील यांनी काकडे यांचा पराभव केला.

१९८९ पर्यंत पवार विरूद्ध काकडे कुटुंब असा राजकीय संघर्ष राहिला. त्यानंतर काकडे कुटुंब हे सक्रिय राजकारणापासून थोडे दुरावले. १९९८ च्या निवडणुकीत भाजपकडून काकडे कुटुंबीयांतील विराज काकडे यांनी शरद पवार यांच्याविरोधात निवडणूक लढविली. मात्र, त्यांचा निभाव लागला नाही. दरम्यानच्या काळात १९९१ मध्ये अजित पवार हे, तर २००४ पासून खासदार सुप्रिया सुळे या बारामतीचे प्रतिनिधित्त्व करत आल्या आहेत. त्यामुळे काकडे कुटुंब हे आता बारामतीच्या राजकारणात मागे पडले आहे.

# मतदान करून लोकशाहीचा उत्सव साजरा करा

## युवक मेळाव्यात सहभागी युवकांशी दूरदृष्यप्रणालीद्वारे डॉ.दिवसे यांनी संवाद साधला

**पिंपरी | प्रतिनिधी**

वैश्विक ओळख असलेल्या भारतासारख्या लोकशाही राष्ट्रात निवडणूक प्रक्रिया व मतदानाच्या अधिकाराचे अनन्यसाधारण महत्व लक्षात घेता २०१९ च्या लोकसभा निवडणूकीच्या तुलनेत लोकसभा निवडणुकीत जिल्ह्यातील मतांचा टक्का वाढविण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून व्यापक प्रयत्न केले जात आहे.

नवमतदारांनी लोकशाहीच्या सर्वात मोठ्या उत्सवात उत्साहाने सहभागी व्हावे आणि प्रथम मतदान करून हा उत्सव साजरा करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्यावतीने आयोजित युवक मेळाव्यात सहभागी युवकांशी दूरदृष्यप्रणालीद्वारे डॉ.दिवसे यांनी संवाद साधला. यावेळी उपजिल्हाधिकारी अर्चना तांबे, तहसीलदार राधिका बारटक्के उपस्थित होते.




डॉ.दिवसे म्हणाले, मतदानाद्वारे आपण चांगले प्रतिनिधी निवडूण देवू शकतो. देशाचे भविष्य असलेल्या युवकांनी या प्रक्रियेत सहभाग वाढाविणे गरजचे आहे. नवमतदारांची नोंदणी करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने वर्षभरात अनेक उपक्रम राबविले आहे. तरीदेखील जिल्ह्यातील युवकांच्या लोकसंख्येच्या तुलनेत केवळ २५ ते ३० टक्के मतदारांनी मतदार नोंदणी केली आहे.

### वयोवृद्ध मतदारांचा आदर्श समोर ठेवा

जिल्हाधिकारी म्हणाले, लोकशाही बळकट करण्यात वयोवृद्ध मतदारांचे मोठे योगदान आहे. जिल्ह्यात 85 वर्षापेक्षा अधिक वय असलेल्या मतदारांना द्यावयाच्या सुविधेबाबत त्यांच्याशी संपर्क केला असता मतदान केंद्रावर अभिमानाने मतदान करण्याची इच्छा अधिकांश ज्येष्ठ नागरिकांनी व्यक्त केली.

त्यांच्या या कर्तव्यभावनेचा आदर्श युवकांनी समोर ठेवावा आणि मतदार नोंदणी तसेच मतदानात सहभाग घ्यावा. महाविद्यालयाच्या विविध उपक्रमातदेखील उत्साहाने सहभागी होऊन नेतृत्वगुण आणि संवादकौशल्य विकसित करावे. समाज माध्यममांचा उपयोग सकारात्मकता निर्माण करण्यासाठी करावा आणि आपल्या सहभागातून समाज आणि देश समृद्ध करावा, असे आवाहन त्यांनी केले.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर देशाने लोकशाही व्यवस्था स्वीकारली. जगातील सर्वात मोठा लोकशाही देश म्हणून भारताची ओळख आहे. अनेक देशात महिलांना मताधिकारासाठी लढा द्यावा लागला, मात्र भारताने स्वातंत्र्यानंतर संविधानाद्वारे महिलांना मताधिकार प्रदान केला. अशा लोकशाही व्यवस्थेत निवडणुकीला महत्त्व असताना पुण्यासारख्या शहरी भागात राज्यात होणाऱ्या सरासरी मतदानापेक्षा कमी मतदान होते. लोकशाही सुदृढ करण्यासाठी मतदान करणे महत्वाचे आहे, असेही श्री.दिवसे म्हणाले.

आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनातर्फे युवक, नवमतदार, महिला, दिव्यांग, जेष्ठ नागरिक आणि सर्वसाधारण मतदार यांचा निवडणूक प्रक्रियेतील सहभाग वाढविण्यासाठी सुनियोजित मतदार शिक्षण व निवडणूक सहभाग कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून प्रत्येक कुटुंबापर्यंत मतदानाचा संदेश पोहचविण्यासाठी व मतदार जाणीव जागृतीच्या उद्देशाने जिल्हाभरात सर्वदूर शालेय विद्यार्थी, शिक्षक व नागरिक यांच्या सहभागाने मतदार जागृती रॅलींचे विविध ठिकाणी आयोजन करण्यात आले आहे.

देशाच्या हितासाठी व विकासासाठी मतदान करणे आवश्यक आहे. लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी मतदारांनी निवडणूकीत मतदानाचा पवित्र हक्क बजावला पाहिजे.या निमित्ताने जिल्हयात विविध स्पर्धा, जनजागृतीचे कार्यक्रम ही शालेय, महाविद्यालयीन पातळीवर आयोजित केलेले आहेत.

### नवमतदार नोंदणीसाठी 15 एप्रिलपर्यंत संधी

**» पुणे, शिरुर आणि मावळ लोकसभा मतदारसंघातील मतदार नोंदणी करून इच्छिणाऱ्या युवकांसाठी १५ एप्रिल रोजी रात्री १२ वाजेपर्यंत मतदार नोंदणी करण्याची संधी आहे.. युवकांनी निवडणूक आयोगाचे संकेतस्थळ https://voters.eci.gov.in किंवा वोटर हेल्पलाइन ॲपवर आपल्या जागेवरच मतदार नोंदणी करण्याची सुविधा आहे. मतदार नोंदणीसाठी केवळ रहिवासी आणि वयाचा पुरावा आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.**

# पुलाच्या कामाची मुदत संपली तरी काम सुरूच!

## सांगवी ते बोपोडी या मुळा नदीवरील पुलाचे काम अंतिम टप्प्यात

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या वतीने सांगवी ते बोपोडी या मुळा नदीवरील पुलाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. त्यासाठी ४२ कोटींचा खर्च करण्यात आला असताना त्याच पुलासाठी २० कोटी रुपयांच्या खर्चाची नवी निविदा काढण्यात आली आहे.

महापालिकेच्या वतीने सांगवी ते बोपोडी या मुळा नदीवरील पुलाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. त्यासाठी ४२ कोटींचा खर्च करण्यात आला असताना त्याच पुलासाठी २० कोटी रुपयांच्या खर्चाची नवी निविदा काढण्यात आली आहे. पुलावरील कमान, आकर्षक रचनेतील सजावटीसाठी निविदा काढल्याचा दावा प्रशासनाने केला आहे.

पिंपरी-चिंचवड आणि पुणे शहरास जोडणाऱ्या सांगवीजवळील स्पायसर महाविद्यालय येथील अरुंद पुलामुळे वाहतुकीचा खोळंबा होत आहे. या एकपदरी पुलावार वारंवार वाहतूक कोंडी होते. त्यासाठी सांगवीतील दत्त आश्रम मठ ते बोपोडीतील चंद्रमणी नगर असा असा पूल उभारण्याचे काम हाती घेतले आहे. पूल ७६० मीटर लांबीचा असून दोन पदरी आहे. त्यांची रुंदी १८.६० मीटर आहे. सांगवीच्या बाजूने ८० मीटर आणि पुण्याच्या बाजूस ५५५ मीटरचा पोहोच रस्ता आहे. पुलासाठी ४१ कोटी ६३ लाख खर्चास स्थायी समितीने ११ सप्टेंबर २०२१ रोजी मंजुरी दिली होती. त्यातील निम्मा खर्च पुणे महापालिका देणार आहे. पुलाचे काम टी अँड टी कंपनी करीत आहे.



सांगवी-बोपोडी पुलावरील कमान, आकर्षक रचनेत सजावट आणि अनुषंगिक कामे करण्यात येणार आहेत. त्यासाठी १९ कोटी ६३ लाख खर्चाची नवीन निविदा काढली असल्याचे कार्यकारी अभियंता संध्या वाघ यांनी सांगितले.

सांगवी येथील स्पायसर महाविद्यालयास जोडणाऱ्या मुळा नदीवरील पूल अरूंद आहे. या एक पदरी पुलावर वारंवार वाहतूक कोंडी होते. हे टाळण्यासाठी महापालिकेने सांगवी ते बोपोडी असा नवा पूल बांधण्याचा निर्णय घेतला हा पूल वेळेत सुरू केल्यास नागरिकांची वळसा घालून जाण्याची गैरसोय टळणार आहे.

### त्याच कामासाठी नव्याने निविदा...

**» कामाची मुदत दोन वर्षे होती. काम पूर्ण करून पूल वाहतुकीस जानेवारी २०२४ ला सुरू करण्याचे नियोजन होते. मात्र, पुण्याकडील कृषी महाविद्यालयाची जागा उपलब्ध होत नसल्याने हे काम रखडले होते. अखेर ती जागा उपलब्ध झाल्याने काम अंतिम टप्प्यात आले. हा पुल पावसाळ्यापूर्वी तयार होईल, असा दावा पालिकेच्या अधिकाऱ्यांनी केला आहे. काम पूर्णात्वाकडे असताना प्रशासनाने या पुलासाठी आणखी एक निविदा प्रसिद्ध केली आहे. स्थापत्य प्रकल्प विभागाने १९ कोटी ६३ लाख ५६ हजार ३९६ रुपये खर्चाची निविदा नुकतीच प्रसिद्ध केली आहे. पुलाची पूर्वी निविदा प्रसिद्ध झालेली असताना त्याच कामासाठी नव्याने निविदा राबवून खर्च केला जात असल्याबद्दल शंका उपस्थित केली जात आहे. सजावटीवर २० कोटींची उधळण केली जाणार असल्याचा आरोप होऊ लागला आहे.**

# लोकांमधील खासदार हवाय की सेटवरचा

## पूर्व हवेलीतील दौऱ्यात शिवाजीराव आढळराव पाटील यांचा तरुणांना प्रश्न

**पुणे | प्रतिनिधी**

आढळराव पाटील अजित पवार गटा सोबत गेले, डॉ. अमोल कोल्हे आणि शिवाजीराव आढळराव पाटील या दोघांमध्ये तगडी लढत होण्याची शक्यता आहे. सध्या डॉ. अमोल कोल्हे आणि शिवाजीराव आढळराव पाटील यांच्यात आरोप-प्रत्यारोप रंगला आहे.

तुम्हाला स्टुडिओच्या सेटवरचा खासदार पाहिजे का लोकांमध्ये असणारा पाहिजे हे ठरवण्याची देखील हीच वेळ आहे. अशी साद महायुतीचे शिरूर लोकसभेचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी तरुण मतदारांनी दिली.

कुंजीरवाडी येथे गावभेट दौऱ्यातील सभेत ते बोलत होते. ते म्हणाले, ज्यांनी पाच वर्षांत रुपयाचा निधी आणला नाही, ज्यांच्या बोलण्यात वास्तविकता नाही, अशा व्यक्तीला दूर करायची हीच संधी लोकसभेच्या निवडणूकीच्या निमित्ताने मतदार म्हणून तुम्हाला आहे.



देशाचे भवितव्य ठरविणारी ही महत्वाची निवडणूक आहे. या मतदारसंघातील केंद्राच्या निधीवर उभे राहणारे प्रकल्प मार्गी लावण्यासाठी मोदींना पाठबळ द्यावे लागेल, त्यासाठी खासदार म्हणून पुन्हा एकदा मला पाठबळ द्या.

यावेळी भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे पाटील, पुणे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील, हवेली तालुका अध्यक्ष दिलीप नाना वल्हेकर, पीडीसीसी बँकेचे संचालक प्रदीप कंद, बाजार समिती सभापती दिलीप काळभोर, हवेली बाजार समितीचे संचालक राजाराम कांचन, शिवसेनेचे विपुल शितोळे, व्हीजेएनटी सेलचे हवेली तालुका अध्यक्ष दिलीप गाडेकर आदी यावेळी उपस्थित होते. या दौऱ्यादरम्यान आढळराव पाटील यांनी दादासाहेब तुपे, सचिन तुपे, सुमित तुपे यांच्या निवासस्थानी भेट दिल्या.

आढळराव पाटील म्हणाले, खासदार अमोल कोल्हे यांच्यात हिंमत असेल तर त्यांनी त्या खासदारांचे नाव जाहीर करावे. कोल्हे हे फिल्मी डायलॉगबाजी करणारे खासदार आहेत. शिरूर लोकसभा मतदारसंघाला काम करणारा खासदार हवा आहे. फिल्मी डायलॉगबाजी करणारा अभिनेता नको आहे.

> गेल्या 15 वर्षात तुमच्या भागात आतापर्यंत कितीतरी वेळा या भागात मी आलो आहे. अनेक कामांसाठी खासदार निधी दिला आहे. त्यात रस्ते असतील अन्य प्रकल्प असतील त्यासाठी कायम तुमच्यासाठी कार्यरत राहिलो आहे. आता तर मतदारसंघातील मोठे प्रकल्प मार्गी लावायचे आहेत.त्यासाठी लोकसभेत जाण्यासाठी तुमचे पाठबळ हवे
>
> **- शिवाजीराव आढळराव पाटील,**
> **महायुती उमेदवार शिरुर लोकसभा मतदारसंघ.**

कोल्हे धाकल्या धन्याचं नाव घेऊन पैसे कमावतात हे त्यांना शोभत नाही. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज हे आमच्या जिव्हाळ्याचे आहेत. आमचे आदराचे स्थान आहेत. कोल्हे उगाच बोलून व्यापारासाठी, धंद्यासाठी निवडणुकीसाठी उपयोग करू नका, असा सल्लाही आढळराव पाटील यांनी दिला आहे.

शिरुरमध्ये लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराला चांगलाच वेग आला आहे. येथे सत्ताधारी महायुती आणि विरोधी बाकावरील महाविकास आघाडी यांनी आपापल्या उमेदवारांची घोषणा केलेली आहे. या जागेवर मविआतर्फे विद्यमान खासदार अमोल कोल्हे (र महायुतीतर्फे शिवाजीराव आढळराव पाटील यांना तिकीट देण्यात आलंय. हे दोन्ही नेते आता पूर्ण ताकदीने प्रचाराला लागले आहेत.

# मुळशी वनविभागाकडून अवैध वृक्षतोडीवर कारवाई

## मालकी क्षेत्रात विनापरवानगी अवैध वृक्षतोड : एकाच कारवाईत आठ लाखांचा दंड

**पुणे | प्रतिनिधी**

मुळशी तालुक्यात विकासाच्या नावाखाली बऱ्याच वेळा वृक्षसंपदेची कत्तल केली जाते. काही वेळा वनविभागाची रितसर परवानगी घेतली जाते, तर बऱ्याच प्रकरणात वनविभागाकडे असणाऱ्या अपुऱ्या मनुष्यबळाचा फायदा घेऊन कोणाच्या लक्षात येणार नाही हे गृहीत धरून मालकी क्षेत्रात विनापरवानगी अवैध वृक्षतोड केली जाते.

नुकतेच असेच एका प्रकरणात मौजे नेरे येथे घडला. विकासकाला विनापरवानगी वृक्षतोड करणे चांगलेच महागात पडले. या प्रकरणात वनपरिक्षेत्र अधिकारी तथा वृक्ष अधिकारी पौड (मुळशी) संतोष चव्हाण यांनी तब्बल आठ लाख रुपयांचा दंड बजावला आणि तो वसुलीही केला.

दत्तवाडी (नेरे)येथील वसुंधरा सामाजिक उन्नती वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धन सहकारी संस्था मर्यादित यांनी 7 मार्च रोजी मुळशी वनविभागाच्या भरे येथील कार्यालयात त्यांचे मालकीच्या 06 हे.33.50 आर इतक्या क्षेत्रात त्यांनी सन 2016मध्ये लावलेले एकूण 400 वृक्ष व इतर नैसर्गिकरीत्या उगवलेले वृक्ष यांची अवैध वृक्षतोड झालेबाबत तक्रारी अर्ज दाखल केला होता.

अतुल साठे, बाबासाहेब बुचडे यांचेसह इतर 30-40 लोकांनी मिळून हे कृत्य केल्याचे तक्रारीमध्ये नमूद केल्यानुसार वनविभागाचे घोटवडे वनपरिमंडळ अधिकारी प्रज्ञा बनसोडे, कासारसाई नियतक्षेत्राचे वनरक्षक पांडुरंग कोपणर यांनी वनपरिक्षेत्र अधिकारी पौड यांच्या आदेशानुसार



जागेवर जाऊन स्थळपाहणी केली व पंचांसमक्ष स्थळ पंचनामा नोंदवला असता त्यामध्ये सुमारे 800-850 झाडांची तोड झाल्याचे निष्पन्न झाले.

त्यानुसार पुढील चौकशीसाठी आरोपींना नोटीस बजावली असता आरोपी यांनी भरे येथील वनपरिक्षेत्र कार्यालयात उपस्थित राहून वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष चव्हाण यांचा समक्ष दंड आकारण्यात आला व तो वसूल करण्यात आला.

वन विभागाच्या घोटवडे वनपरिमंडळ अधिकारी प्रज्ञा बनसोडे, कासारसाई नियतक्षेत्राचे वनरक्षक पांडुरंग कोपणर यांनी पौड वन परिक्षेत्र अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार जागेवर जाऊन पाहणी केली. त्या वेळी सुमारे ८०० झाडांची तोड झाल्याचे लक्षात आले. सध्या या कारवाईची सर्वच स्तरातून चर्चा होत असून मालकी क्षेत्रातील अवैध वृक्षतोड प्रकरणात आजअखेर महाराष्ट्रातील सर्वात मोठी दंडात्मक कारवाई असल्याचे बोलले जात आहे. या कारवाईमुळे मुळशीतील अवैध वृक्षतोड करणाऱ्यांमध्ये खळबळ माजली असल्याचे दिसून येत आहे.

अवैध वृक्षतोड करणे हा कायद्याने गुन्हा असून कुठेही विनापरवानगी वृक्षतोड आढळल्यास त्यावर योग्य ती कडक कारवाई करण्यात येईल. वृक्षतोड करणे अनिवार्य असल्यास वनविभागाकडे रीतसर अर्ज दाखल करावा, प्रकरणाची शहानिशा करून व प्रकरणाची निकष तपासून रितसर परवानगी देण्यात येईल.